राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २४.०३.२०२५ अखेरचा उन्हाळी हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

❖ **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. लातूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या अवकाळी पावसाची नोंद झाली. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.

❖ **उन्हाळी हंगाम २०२४-२५**

❖ **पिक परिस्थिती :**

राज्यात उन्हाळी पिकांचे सरासरी क्षेत्र ३.५० लाख हेक्टर असून दि.२४ मार्च, २०२५ अखेर ४.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर (११६%) पेरणी झाली आहे. मागील वर्षी दि.२६.०३.२०२४ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील पेरणी क्षेत्र २.९९ लाख हे. (सरासरीशी ८५%) होते.

- उन्हाळी भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
- उन्हाळी ज्वारी पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
- उन्हाळी मका पिक वाढीच्या ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे.
- उन्हाळी बाजरी पिक कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- उन्हाळी भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
- उन्हाळी सोयाबीन, सुर्यफुल, तीळ, मूग पिके फुलोरा अवस्थेत आहेत.

पर्जन्यमान (२०२४)

दि.१ जून ते ३१ ऑक्टोंबर, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०७५.३ मि.मी. असून दि.३१ ऑक्टोंबर, २०२४ पर्यंत १२५६.० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११६.८ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.३१.१०.२०२३ अखेर ९२८.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ८६.४ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.३१ ऑक्टोंबर, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पर्जन्यमान टक्केवारी	जिल्हे संख्या	जिल्ह्यांची नावे
१	० ते २५ %	०	----
२	२५ ते ५० %	०	----
३	५० ते ७५ %	०	----
४	७५ ते १०० %	३	रायगड, कोल्हापूर, अमरावती.
५	१०० % पेक्षा जास्त	३१	ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

राज्यात दि.३१ ऑक्टोंबर, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, ० तालुक्यात २५ ते ५०%, ४ तालुक्यात ५० ते ७५%, ५१ तालूक्यात ७५ ते १००% तर ३०० तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **नैसर्गिक आपत्ती :**

दि.२४ मार्च, २०२५ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, मार्च-२०२५ मधील अवेळी पावसामुळे शेती / फळपिकांचे ४६ हे. क्षेत्र बाधित झाले आहे.

❖ **किड व रोग :** निरंक.

उन्हाळी हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.२४ मार्च, २०२५ अखेर)


उन्हाळी तीळ; ०.२४७; ६%
उन्हाळी सोयाबीन; ०.०३९; १%
इतर गळीतधान्य; ०.००४; ०%
उन्हाळी भात; १.३९; ३४%
उन्हाळी सुर्यफ़ुल; ०.०४३; १%
उन्हाळी भुईमुग; ०.८३; २१%
इतर कडधान्य; ०.०१९; ०%
उन्हाळी उडीद; ०.०१४; ०%
उन्हाळी मूग; ०.११३; ३%
इतर तृणधान्य; ०.०२०; १%
उन्हाळी बाजरी; ०.३१; ८%
उन्हाळी ज्वारी; ०.२७०; ७%
उन्हाळी मका; ०.७५; १८%

उन्हाळी हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२४ मार्च, २०२५ अखेर)



विभाग निहाय पिक परिस्थिती

कोकण विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.१४ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.०६ लाख हेक्टर क्षेत्रावर (४१%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिक रोप ते फुटवेच्या अवस्थेत आहे.
  - भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :** निरंक.

नाशिक विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.६४ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (६६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी भुईमूग पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - उन्हाळी मका व बाजरी पिके वाढीच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :** निरंक.

पुणे विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.२८ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - बाजरी, मका पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी मूग, उडीद, सोयाबीन पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :** निरंक.

कोल्हापूर विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.१३ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.०९ लाख हेक्टर क्षेत्रावर (६९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिक वाढीच्या अवस्थेत आहेत.
  - उन्हाळी भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :** निरंक.

छ.संभाजीनगर विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.३३ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (११४%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी ज्वारी पिक कणसे लागणे ते कणसे भरण्याच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी मका पिक वाढीच्या ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी बाजरी पिक कणसे लागणे ते कणसे भरण्याच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी भुईमूग पिक फुलोरा ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी सुर्यफुल, तीळ, मूग पिके फुलोरा अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

लातूर विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या अवकाळी पावसाची नोंद झाली. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.७२ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर (७६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी भुईमूग पिक फुलोरा अवस्थेत आहे.
  - इतर पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

अमरावती विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.४३ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर ०.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१७५%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी ज्वारी, मका, भुईमूग, तीळ पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

नागपूर विभाग उन्हाळी हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश कोरडे व निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तापमानात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.८४ लाख हेक्टर असून, दि.२४ मार्च, २०२५ अखेर १.४४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१७१%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - उन्हाळी भात पिक वाढीच्या ते फुटवेच्या अवस्थेत आहे.
  - उन्हाळी मका, तीळ, भुईमूग, मूग पिके वाढीच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :** निरंक.

महाराष्ट्र राज्यातील उन्हाळी हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.२४.०३.२०२५ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

अ.क्र.	पिके	पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१)	मागील वर्षाची पेरणी दि.२६.०३.२०२४ अखेर	सन २०२४-२५ मधील दि.२४.०३.२०२५ अखेर प्रत्यक्ष पेरणी	पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१)	पेरलेल्या क्षेत्राची मागील वर्षाच्या पेरणी क्षेत्राशी टक्केवारी
१	२	३	४	६	स्तंभ ६ ची स्तंभ ३ च्या तुलनेत %	स्तंभ ६ ची स्तंभ ४ च्या तुलनेत %
१	उन्हाळी भात	८३०११	१३७०४३	१३९१२०	१६८	१०२
२	उन्हाळी मका	५८०१२	३७१३५	७४६०९	१२९	२०१
३	उन्हाळी ज्वारी	१२५२३	१९३९७	२६९८३	२१५	१३९
४	उन्हाळी बाजरी	२१५६९	२५८४६	३१३२४	१४५	१२१
५	इतर तृणधान्य	२४८११	१०३९	१९८६	८	१९१
	एकुण तृणधान्य	**१९९९२५**	**२२०४५९**	**२७४०२२**	**१३७**	**१२४**
६	उन्हाळी मूग	१२४७७	४५४९	११३२५	९१	२४९
७	उन्हाळी उडीद	४०६३	४१०	१३७६	३४	३३५
८	इतर कडधान्य	९७६८	६८३	१८८४	१९	२७६
	एकुण कडधान्य	**२६३०९**	**५६४२**	**१४५८५**	**५५**	**२५९**
	एकूण अन्नधान्य	**२२६२३३**	**२२६१०१**	**२८८६०७**	**१२८**	**१२८**
९	उन्हाळी भुईमुग	९०६०५	५५७६१	८३४८४	९२	१५०
१०	उन्हाळी सुर्यफ़ुल	३०७४	५०९	४३१९	१४०	८४९
११	उन्हाळी तीळ	४९९३	१२५२४	२४६७७	४९४	१९७
१२	उन्हाळी सोयाबीन	२३३५५	३५०६	३८८७	१७	१११
१३	ईतर गळीतधान्य (करडई, कारळं, इतर)	१४९८	३२९	३६७	२४	११२
	एकुण गळीतधान्य	**१२३५२६**	**७२६२८**	**११६७३४**	**९५**	**१६१**
	एकुण उन्हाळी पिके	**३४९७५९**	**२९८७३०**	**४०५३४१**	**११६**	**१३६**

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.